## आदेश निशाणी ६५ खाली

१. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी त्यांच्याविरूध्द झालेला उलट तपास नाहीचा आदेश रद्द करण्याबाबत सदरचा अर्ज दिला आहे. त्यावरील वादीतर्फे वकीलांचे म्हणणे वाचले.

२. प्रतिवादी क्र. ४ ते ६ तर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, प्रकरणात दिनांक ११.०१.२०१७ रोजी वादीतर्फे साक्षीदाराचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर प्रकरणात साक्षीदाराचा उलट तपास दिनांक १८.०२.२०१७ रोजी घेणे आवश्यक होते. परंतु, ते न्यायालयात हजर न राहील्याने प्रकरणात उलट तपास नाही असा आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादी हे शेतकरी असुन सदरचा आदेश रद्द न झाल्यास त्यांचे न भरून येणारे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. याउलट, वादीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, अर्जातील कथने चुकीची असुन प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी निष्काळजीपणाने उलट तपास घेतलेला नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचे प्रकरण मालकी घोषीत करून निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केले आहे. प्रकरणात वादीतर्फे साक्षीदार हजर असताना प्रतिवादी क्र. ४ ते ६ हजर न राहील्याने साक्षीदाराचा उलट तपास नाही असा आदेश पारीत करण्यात आलेला होता. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी तो आदेश रद्द करावा असा अर्ज दिला आहे. अर्जातील नमुद कारण पाहता, प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना न्यायहेतू वादीच्या साक्षीदारांना उलट तपासणी करण्याची संधी देणे कायद्याने जरूरी आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांचा अर्ज २५०/- रूपये दंड लावुन निशाणी ६५ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी सदरचा दंड वादीस द्यावा.

दिनांक : ०५.०३.२०१८

**( प्रि.म. पाटील )**
सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, कळंब.